-: प्रेसनोट दिनांक १९/०३/२०२२ :-

**पुडंलीक विठठल पाटील, सहायक पोलीस उप निरीक्षक, नेसरी पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर यांनी ५०००/- रुपयाची लाच मागणी करुन ५०००/- रुपये लाच स्विकारलेबाबत.......**

तक्रारदार यांचे त्यांचे घराजवळ कोल्ड्रींक्सचे दुकान आहे. त्यामध्ये ते पान तंबाखु सिगारेट ही ठेवतात. आलोसे पुंडलीक पाटील यांनी व अन्य पोलीस होमगार्ड यांनी अवैद्य दारु, गुटखा यांचे अनुषंगाने त्यांचे दुकान व घरावर छापा टाकलेला होता. आलोसे पुंडलीक पाटील यांनी दिनांक १८/०३/२०२२ रोजी तक्रारदार यांना भेटुन तक्रारदार यास टाकलेल्या छाप्याचे अनुषंगाने तुझ्यावर गुन्हा दाखल करतो अशी भिती घालुन जर कोणतीही कायदेशिर कारवाई नको असेल तर ५००० रु द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे ५०००/- रुपयाची मागणी केली.

दिनांक १९/०३/२०२२ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली होती. तक्रारीप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये पुडंलीक पाटील यांनी तक्रारदाराकडे ५००० रुपये लाचेची मागणी केलेचे निषन्न झाले.

दिनांक १९/०३/२०२२ रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता नेसरी पोलीस ठाणचे बाजुस असलेल्या मोकळया जागी पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन आलोसे पुडंलीक पाटील यांनी ५००० रूपये लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडणेत आले आहे. सदरबाबत पुंडलीक पाटील यांचेविरूध्द नेसरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रीया सुरू आहे.

सदरची कारवाई मा. श्री राजेश बनसोडे, पोलीस उपआयुक्त/ पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. सुरज गुरव, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, मा. श्री सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे श्री आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांचे मार्गदर्शनाखाली श्री सतीश मोरे, पोलीस निरीक्षक, सपोफौ संजीव बंबरगेकर, पोना विकास माने, पोना सुनिल घोसाळकर, पोना नवनाथ कदम, चापोहेकॉ सुरज अपराध, अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १/८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९०११२२८३३३,

४) कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९. ५)हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४,

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.